# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यात बहुमोल योगदान -

- डॉ. बाबुराव गुरव

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३३वा स्मृतीदिन साजरा**

**कोल्हापूर :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील १८५७ च्या स्वातंत्र्यसमरानंतर १९४२चा क्रांतीलढा हा स्वातंत्र्यचळवळीचा सर्वात मोठा संघटीत लढा होता. या लढ्याने स्वातंत्र्य संग्रामाची यशस्वी सांगता केली. या लढ्यामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी भूमीगत राहून महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात जनजागृतीचे आणि स्वातंत्र्यसैनिकांना सर्वप्रकारची मदत करण्याचे कार्य केले आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढयातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांनी शिक्षक, शेतकरी, कामगार, विदयार्थी यांना क्रांतीकार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड, बॅरीस्टर नाथ पै यांच्या सोबत त्यांनी चळवळीत सहभाग घेतला. त्यांनी केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य खूपच महत्वाचे आहे. असे विचार ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत व लेखक डॉ.बाबुराव गुरव यांनी मांडले. ते डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३३व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमामध्ये बोलत होते. 'भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान' या विषयावर बोलताना त्यांनी भूमिगत आंदोलन, प्रतिसरकार यातील बापूजी साळुंखे यांच्या योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले कि, बापूजींचे आयुष्य त्याग आणि समर्पणाचे जीवन होते. ते प्रखर राष्ट्रभक्त होते. महात्मा गांधींनी देशवासियांना दिलेल्या हाकेला 'ओ' देत त्यांनी राजवैभवाचा त्याग करीत स्वातंत्रसंग्रामात उडी घेतली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था उभी करून गोर-गरीबांच्या मुला-मुलींना शिक्षणाचा ज्ञानवारसा दिला. त्यांच्या या स्वातंत्र्य संग्रामाच्या आणि नंतर उभ्या केलेल्या शैक्षणिक कार्यात त्यांना संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी मोलाची साथ दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे अर्थ सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी कार्यक्रमाचे औचित्य प्रतिपादन करताना आपल्या भाषणात त्यांनी बापूजींचे शैक्षणिक योगदान व जीवन कार्य यावर मुलभूत विचार मांडले. शिक्षणमहर्षी डॉ. त्यांनी दिलेली तत्वप्रणाली आचरणात आणून सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी झोकून देऊन ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले पाहिजे, असे ते म्हणाले.

संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे आभार मानताना म्हणाल्या, 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयवादाने प्रेरित होउन बापूजींनी ही संस्था उभी केली व शिक्षणाची गंगा वंचितवर्ग व दुर्गम भागापर्यंत पोहचविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या आचार आणि विचारांचा वसा आणि वारसा संस्थेतील नव्या पिढीने जतन केला पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लाल बहादूर शास्त्री कॉलेज, साताराचे प्रा.डॉ.महेश गायकवाड यांनी केले तर या कार्यक्रमाचे संयोजन आर.आर. कॉलेज, जतचे प्रा. डॉ श्रीकांत कोकरे यांनी केले. सुरूवातीला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरूवात संस्था प्रार्थना व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, सिनिअर व ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेतील प्रशासकीय सेवक  ऑनलाईन उपस्थित होते. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता करणेत आली.